**(CNR NO. MHSNO60014082018)**

## नि. दि. दा. क्र. १६५/२०१८ मधील नि. ५ वरील आदेश
## ( चंपाबाई देसाई वि. आहिल्याबाई कदम व इतर )

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज दि.प्र.सं. आदेश ३९ रुल १, २ व कलम १५१ प्रमाणे प्रतिवादी नं. ११ ते १६ विरुध्द अंतरिम तुर्तातुर्त मनाई आदेशाकरीता दाखल केलेला आहे.

२. वादीच्या अर्जातील थोडक्यात कथन असे की, वादी व प्रतिवादी नं. १ ते ११ हे एकत्र कुटुंबीय असून दावामिळकती या त्यांच्या वडीलार्जित मालकी वहिवाटीच्या आहेत. वादी व प्रतिवादी नं. १ ते ११ चे मूळ पूर्वहक्कदार राजाराम नारायण गायकवाड हे असून त्यांना दोन पत्नी होत्या. त्यापैकी पहिली पत्नी लक्ष्मीबाई ही सन १९३७ मध्ये मयत असून तिला वारस वादी व प्रतिवादी नं. १ ते १० हे आहेत. पहिल्या पत्नीच्या मृत्यूनंतर राजाराम यांनी दुसरा विवाह केला व त्या पत्नीचेही नाव त्यांनी लक्ष्मीबाई असेच ठेवले. तिला वारस प्रतिवादी नं. ११ ही आहे. अशाप्रकारे राजाराम गायकवाड याची दुसरी पत्नी लक्ष्मीबाई हयात असेपावेतो वादी व प्रतिवादी नं. १ ते ११ यांची दावामिळकतीत सामाईक हक्काने कब्जेवहिवाट होती परंतु, लक्ष्मीबाई सन २०१४ मध्ये वादी व प्रतिवादी नं. १ ते ११ च्या एकत्र कुटुंबात मयत झालेनंतर प्रतिवादी नं. ११ ही वादीच्या दावामिळकतीमधील सामाईक वहिवाटीस हरकत व अडथळा करू लागली व डिसेंबर २०१७ मध्ये तिने दावामिळकतीचे वाटप करून देण्यास वादीस नकार दिला. त्यामुळे दावा दाखल करणेकरीता आवश्यक ती कागदपत्रे वादीने काढली असता तिला समजून आले की, प्रतिवादी नं. ११ हिने सन १९९० मध्ये वर्दी अर्ज व दत्तकपत्राअन्वये संपूर्ण वादमिळकती प्रतिवादी नं. १२ च्या नावे केल्याची व प्रतिवादी नं. १२ ने दि.२०/०२/१९९१ रोजी दावा कलम १ब मधील संपूर्ण मिळकती प्रतिवादी नं. ११, १४ व १५ यांनाव दावा अर्ज कलम १(क) ची मिळकत प्रतिवादी नं. १६ यांना

पोकळ व बेकायदेशीर खरेदीपत्राने विक्री केल्याबाबतचे वादीला समजले. त्यामुळे हक्कज्ञापनाकरीता, वाटपाकरीता व निरंतर मनाईकरीता वादीने प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. दावेचा अंतिम निकाल लागणेस बराच कालावधी लागणार असल्याने प्रतिवादी नं. ११ ते १६ हे दावामिळकतीबाबत हस्तांतरणाचे व्यवहार करण्याची व त्यायोगे दावामिळकतीमधील वादीच्या शांततामय सामाईक वहिवाटीस हरकत करण्याची शक्यता वादीस वाटल्याने वादीने प्रस्तुतचा तुर्तातुर्त मनाईचा अर्ज प्रतिवादी नं. ११ ते १६ यांच्याविरूध्द दाखल केलेला आहे.

३. प्रतिवादी नं. १६ याचेविरूध्द प्रस्तुतचा दावा हा एकतर्फा सुरु आहे. वादीच्या तुर्तातुर्त मनाई अर्जास प्रतिवादी नं. ११ ते १५ यांनी नि. ६५ कडे म्हणणे दाखल करून वादीचा अर्ज व विशेषतः मुळ पुरुष राजाराम गायकवाड यांचे लक्ष्मीबाई हिचेबरोबर पहिले लग्न झालेबाबतची बाब व त्या लग्नसंबंधातून वादी तसेच प्रतिवादी नं. १ ते १० हे वारस असल्याबाबतची बाब प्रतिवादीने नाकारलेली आहे. तसेच प्रतिवादीने वादीने दिलेली वंशावळही नाकारलेली आहे. त्यांच्या मते मुळ पुरुष राजाराम यास लक्ष्मीबाई नावाची एकच पत्नी होती व ती या प्रतिवादी नं. ११ ची आई होती. प्रतिवादी नं. ११ खेरीज मयत राजाराम यास अन्य कोणी सरळ व कायदेशीर वारस नाही. दि.२९/०५/१९७८ रोजी लक्ष्मीबाई हिने प्रतिवादी नं. १२ यास हिंदू धर्म शास्त्र रितीरीवाजाप्रमाणे दत्तक घेतले असून सन १९८० मध्ये दिले वर्दी अर्जानुसार तोच दावामिळकतीचा सद्य स्थितीत एकमेव सरळ वारस आहे. कौटुंबिक गरजेपोटी प्रतिवादी नं. १२ याने दावामिळकतीपैकी काही मिळकती अन्य प्रतिवादींना विकलेली आहे. अशाप्रकारे मुळ पुरुष राजाराम मयत झाल्यापासून म्हणजेच १९४७ पासून आजपर्यंत केवळ प्रतिवादी नं. १२ व त्याच्यातर्फे खरेदी घेतलेल्या इसमांची मालक नात्याने वहिवाट आहे. वादीची दावामिळकतीत कधीही कब्जेवहिवाट नव्हती. त्यामुळे वादीना वाटप करून देण्याचे कोणतेही कारण नाही. वादीची दावा मिळकतीत सामाईक वहिवाटच नसल्याचे वादीस सकृतदर्शनी केस नाही. वादीचा अर्ज मंजूर झाल्यास प्रतिवादीच्या वहिवाटीस हरकत उत्पन्न होवून कठिणावस्था (Hardship) ही केवळ

प्रतिवादीस होणार असल्याने या कारणास्तव वादीचा अर्ज खर्चासहीत नामंजूर करावा अशी विनंती प्रतिवादी नं. ११ ते १६ यांनी याकामी केलेली आहे.

४. वादींच्या कथनांनुसार खालील वादप्रश्न न्यायालयासमोर निर्णयाकरीता उपस्थित झाले असून त्यावरील निर्णय हे न्यायालय कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ. क्र. | वादप्रश्न | निर्णय |
|---|---|---|
| १. | दावा प्रथमदर्शनी वादीच्या बाजूने आहे काय? | अंशतः होकारार्थी |
| २. | सदरचा अर्ज नामंजूर केल्याने वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे काय? | होकारार्थी |
| ३. | न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने आहे काय? | होकारार्थी |
| ४. | आदेश काय? | अंशतः मंजूर. |

## कारणमिमांसा

५. वादीने तिच्या अर्जातील कथनापुष्टयर्थ स्वतःचे शपथपत्र नि.६ कडे , हेळवी यांनी दिलेली वंशावळ नि. ६७/१ व २ कडे, नि.७२ कडे शंकरराव बाबुराव गायकवाड, तसेच नि.७३ कडे बापूसाहेब आप्पासाहेब गायकवाड यांचे शपथपत्र व नि. ५३/१ कडे प्रतिवादी नं. १ आहिल्याबाई पाटील हिचा मृत्यू दाखला हजर केला आहे. अर्जाच्या कामी केले कथनांचे आधारे व हजर केलेल्या कागदपत्रावरून वादीतर्फे विद्वान वकीलांनी युक्तीवाद केला की वादी ही मूळ पुरुष राजाराम गाायकवाडची प्रथम पत्नी लक्ष्मीबाईची मुलगी असून दावामिळकतीमध्ये तिचा प्रतिवादी नं. १ ते ११ यांचेबरोबर

सामाईक हक्क व हिस्सा आहे. दावामिळकतीचे वादी व प्रतिवादी नं. १ ते ११ यांचेदरम्यान वाटप झाल्याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर नाही. त्यामुळे सकृतदर्शनी दावामिळकती या वादी तसेच प्रतिवादी नं. १ ते ११ यांच्या वडीलार्जित मालकी वहिवाटीच्या आहेत. प्रतिवादी नं. ११ ते १५ यांनी त्यांच्या कैफियतीमध्ये मोघमपणाने नातेसंबंध नाकारलेले आहे. त्यावरून वादीचा दावामिळकतीशी संबंध नाही असे म्हणता येणार नाही. वादीची सख्खी बहिण प्रतिवादी नं. १ आहिल्याबाई पाटील हिच्या मृत्यू दाखल्यावर वडिलांच्या नावासमोर राजाराम पाटील व आईच्या नावासमोर लक्ष्मीबाई नमूद आहे. त्यामुळे सकृतदर्शनी वादी ही मूळ पुरुष राजाराम पाटील याची वारस मुलगी असल्याचे स्पष्ट होते. प्रतिवादी नं. ११ ते १६ हे वादमिळकतीस आपलीच नावे नमूद आहेत याचा गैरफायदा घेवून वादीच्या सामाईक वहिवाटीस हरकत करत आहेत व दावा मिळकती हस्तांतरण करण्याच्या प्रयत्नात आहेत. त्यामुळे वादीचा अर्ज मंजूर करावा अशी विनंती करून त्यांनी खालील न्यायनिवाडे हजर केले आहेत.

***1] 2005 D.G.Law(Bombay) 624, Laxman Tukaram V/s Bendrabai Tukaram Karwate***

***2] 1995 D.G.Law(S.C.) 821, Ramchandra Kapse V/s Hariwanshsingh***

***3] A.I.R. 2019 S.C. 719***

६. प्रतिवादी नं. ११ ते १५ तर्फे विद्वान वकीलांनी युक्तीवाद केला की वादी व प्रतिवादी नं. १ ते १० हे मूळ पुरुष राजाराम गायकवाडचे वारस असल्याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा रेकॉर्डवर हजर नाही. वादी ही सन १९४७ पासून आजअखेर पर्यतची तिची सामाईक वहिवाटीची केस उपस्थित करत आहे. परंतु तिची वहिवाट दाखवणारा कागदोपत्री पुरावा याकामी हजर केला नाही.नि.७२ व ७३ कडे वादीने हजर केलेल्या अनुक्रमे शंकरराव बाबुराव गायकवाड व बापूसाहेब आप्पासाहेब गायकवाड यांच्या शपथपत्राबाबत प्रतिवादीने युक्तीवाद केला की, सन १९३७ मधील

स्थिती या दोन्ही व्यक्तींना माहित असल्याचे कारण नाही कारण त्यांनी दिलेल्या वयावरून त्यांचा जन्म १९५५–५६ नंतरचा असू शकतो. त्यामुळे नातेसंबंध दर्शवणारी दिलेली शपथपत्रे वादीला उपयुक्त नाही. नि. ६७/१ व २ ला हेळवी यांनी दिलेल्या वंशवळीबाबत कामी ॲफिडेव्हीट नाही. तसेच नि.५३/१ कडे हजर असलेल्या आहिल्याबाई पाटील हिच्या मृत्यू दाखल्यावरून ती प्रतिवादी नं. ११ चे मुळ हक्कदार राजाराम गायकवाडची मुलगी असल्याचे सिध्द होत नाही. यावरून वादीस सकृतदर्शनी केस नसल्याचे व मनाई अर्ज मंजूर झाल्यास केवळ प्रतिवादीस हार्डशिप होणार असल्याने अर्ज नामंजूर करावा असा युक्तीवाद त्यांनी केला व खालील न्यायनिवाडे हजर केले.

***1] A.I.R. 1996 Delhi High Court***

***2] 2000(1) Mah.L.G. 815***

७. वादीचा तुर्तातुर्त मनाई अर्ज, प्रतिवादीचे म्हणणे, हजर केलेली कागदपत्रे व न्यायनिवाडे यांचे अवलोकन केले.

## मुद्दा क्र. १ बाबत

८. वादीने प्रस्तुतच्या अर्जाअन्वये तिच्या दावामिळकतीमधील कथित सामाईक कब्जेवहिवाटीस दावेच्या अंतिम निकालापावेतो प्रतिवादी नं. ११ ते १६ व तर्फे इसम यांनी हरकत करू नये व दावा मिळकतीबाबत हस्तांतरणाचे व्यवहार करू नयेत अशा दोन मागण्या केलेल्या आहेत. त्यामुळे वादीने सकृतदर्शनी तिचे मूळ पुरुष राजाराम यांचेशी नातेसंबंध व सामाईक कब्जेवहिवाट दाखवले आहे का ते पाहणे जरूरीचे आहे.

९. वादीस सकृतदर्शनी केस आहे की नाही हे केवळ वादीने हजर केलेल्या कागदपत्रावरून व प्रतिज्ञापत्रवरून पाहणे गरजेचे आहे. प्रतिवादीने याकामी कोणता बचाव मांडलेला आहे व कोणती कागदपत्रे हजर केली आहेत यावर वादीची सकृतदर्शनी

केस ठरवता येणार नाही. वादीने हजर केलेल्या कागदांचा अनुक्रमे विचार केल्यास नि.६७/१ ला वादीने हेळवी यांनी दिलेली वंशावळ हजर केली आहे व त्या वंशावळीत मूळ पुरुष राजाराम यास लक्ष्मीबाई नावाची प्रथम पत्नी असल्याचे दर्शवले आहे. परंतु वंशावळ देणारे हेळवी यांचे प्रतिज्ञापत्र सोबत हजर केले नसल्याने सकृतदर्शनी त्यावर विश्वास ठेवता येणार नाही. नि.७२ व ७३ कडे वादीने शंकरराव बाबुराव गायकवाड व बापूसाहेब गायकवाड या दोन वयोवृध्द व वादीच्या भावकीतील इसमाची प्रतिज्ञापत्रे हजर करून मुळ पुरुष राजाराम गायकवाड यास प्रथम पत्नी लक्ष्मीबाई असल्याचे व वादी ही लक्ष्मीबाई व राजाराम यांची मुलगी असल्याचे शपथेवर कथीत केले आहे. सदरच्या शपथपत्रांमधील कथनांना बगल देणारी शपथपत्रे प्रतिवादीनी याकामी हजर केली नाही. त्यामुळे सदर दोन्ही शपथपत्रे व त्यामधील साक्षीदाराचे वय विचारात घेता सकृतदर्शनी मूळ पुरुष राजाराम गायकवाड यास लक्ष्मीबाई ही पहिली पत्नी होती व वादी तिचाी मुलगी आहे असे दिसते. याशिवाय नि.५३/१ कडे हजर असलेल्या मृत्यु दाखल्यावरून व त्यामध्ये नोंद असलेल्या आईवडीलांच्या नावावरून राजाराम गायकवाड याना लक्ष्मीबाई पत्नी होती व मयत आहिल्याबाई ही त्यांची मुलगी होती हे सकृतदर्शनी दिसते. याठिकाणी मयत आहिल्याबाई बाबत व त्या मृत्यू दाखल्यामधील नोंदी या खोटया आहेत असे प्रतिवादीने युक्तीवाद केला. सदरच्या नोंदी ख–या आहे का खोटया आहेत व राजाराम गायकवाड यांना लक्ष्मीबाई ही पत्नी होती का नाही हे पुराव्याअंती ठरणार आहे. परंतु, नि. ५३/१ वर नमूद राजाराम व लक्ष्मीबाई हे ति–हाईत इसम आहेत व मयत आहिल्याबाई ही वादीची सख्खी बहिण नाही असे दाखवणारा कागदोपत्री पुरावा अगर शपथपत्र अभिलेखावर नाही. अशाप्रकारे उपलब्ध असलेल्या नि. ७२ व ७३ कडील प्रतिज्ञापत्रावरून व नि. ५३/१ कडे हजर असलेल्या मृत्यु दाखल्यावरून वादी व राजाराम गायकवाड यांचेत नातेसंबंध असल्याबाबतचे सकृतदर्शनी दिसून येते. अशाप्रकारे वादीने मुळ पुरुष राजाराम याचे बरोबरचे नातेसंबंध दाखवून दिले असल्याने प्रतिवादीने हजर केलेल्या दोन्ही न्यायनिर्णिका व त्यातील गुणक (Ratio) या केसला लागू होत नाही. तसेच वादीने हजर केलेले न्यायनिवाडे हे अंतरिम अर्जाचे चौकशीकरीता सद्यस्थितीत उपयुक्त नसलेने त्यामधील गुणक (Ratio) ही या केसला लागू होत

नाहीत.

१०. सकृतदर्शनी केस व सकृतदर्शनी हक्क वा अधिकार यात फरक आहे. सकृतदर्शनी केस म्हणजे प्रामाणिकपणे व उपस्थित केलेला असा प्रश्न ज्याचा निर्णय केवळ चौकशीअंती गुणावगुणांचा विचार होवून शक्य आहे. मुळ पुरुष राजाराम यांचेशी नातेसंबंध दाखवून दावा मिळकतीमधील तिच्या कथित सामाईक हक्काबाबतचा महत्वपूर्ण व प्रामाणिक प्रश्न वादीने या न्यायालयासमोर उपस्थित केलेला आहे ज्याची निर्गती चौकशीअंती पुराव्यानेच होवू शकते.

११. सन १९४७ पासून सन २०१८ पर्यत दावा मिळकतीत सामाईक कब्जा वहिवाट असल्याचे वादीचे कथन आहे. परंतु, एवढा दिर्घ कब्जा दाखवणारा एकही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर नाही. दावामिळकतीबाबत सन १९९१ मध्ये प्रतिवादी नं. १२ ते १६ यांचेदरम्यान नोंदणीकृत खरेदीपत्रे झालेबाबतचे कथन करून सद्यस्थितीत वादीचा दावा अर्ज कलम १ब व १(क) या दावामिळकतीत कब्जा नाही हे वादीने स्वतः मान्य व कबूल केलेले आहे. वादीने केवळ सकृतदर्शनी नातेसंबंध दर्शविले आहे. ती दावामिळकतीची सहहिस्सेदार आहे की नाही हे पुराव्याअंती ठरणार आहे. त्यामुळे सहहिस्सेदार या नात्याने सद्यस्थितीत तिचा सामाईक कब्जा मान्य करता येणार नाही व तशी अंतरीम मनाई ही देता येणार नाही. तसे केल्यास प्रतिवादी नं. १२ ते १६ यांच्या दावामिळकतीमधील कब्जेस हरकत होवून त्यांच्या न्यायहक्कास इजा होवून त्यांचे नुकसान होण्याची शक्यता आहे. या परिस्थितीत वादीने सकृतदर्शनी दाखवून दिलेल्या नातेसंबंधाचा विचार करून तिचा भविष्यकालीन सामाईक हक्क पुराव्याअंती ठरेपावेतो, दावामिळकतीमधील तिच्या हक्काबाबतची व दावामिळकतीची आहे त्या स्थितीत जपणूक करणेकरीता प्रतिवादी नं. ११ ते १६ विरूध्द दावा मिळकतीबाबत दावेच्या अंतिम निकालापावेतो बक्षिस, लीज, विक्री वा हस्तांतरणाचे अन्य कसलेही व्यवहार करू नयेत म्हणून अंतरिम तुर्तातुर्त मनाई करणे या न्यायालयास गरजेचे वाटते. त्यामुळे मुद्दा क्र. १ चे उत्तर हे न्यायालय अंशतः होकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ बाबत</u>**

१२. वादीला तिचा कथित सामाईक हक्क पुराव्याअंती ठरेपावेतो, दावामिळकतीमधील तिच्या हक्काबाबतची जपणूक करण्याकरीता दिवाणी न्यायालयाच्या आदेशाच्या मध्यस्थीशिवाय अन्य कोणताही पर्याय उपलब्ध नाही. अशास्थितीत न्यायालयीन आदेशाची मध्यस्थी न झालेस हस्तांतरणाचे व्यवहार होण्याची व दावामिळकतीच्या हक्कात बदल होवून वादीच्या न्यायहक्काचे अपरिमित नुकसान होऊ शकते. त्यामुळे मुद्दा क्र. २ चे उत्तर हे न्यायालय होकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. ३ बाबत</u>**

१३. प्रतिवादी नं. ११ ते १६ यांना दावामिळकतीबाबत हस्तांतरणाचे व्यवहार करू नये अशी मनाई दिल्याने दावामिळकत आहे त्या स्थितीत राहून दावामिळकतीमधील हक्काबाबतची स्थिती सुध्दा तशीच राहून प्रतिवादी नं. ११ ते १६ चे कसलेही नुकसान होणार नाही. याउलट तशी मनाई न झाल्यास दावामिळकतीबाबत हस्तांतरणाचे व्यवहार होण्याची व त्यायोगे दावामिळकतीमधील वादी हिच्या कथित सामाईक हक्काबाबत गुंतागुंती निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. वादी ही एक ९२ वर्षीय वयोवृध्द महिला असल्याने भविष्यकालीन हस्तांतरणामुळे प्रकरण लांबण्याची व तिला तिच्या हयातीत न्याय न मिळाल्याने होणारे नुकसान प्रतिवादीच्या नुकसानीपेक्षा निश्चितच मोठे आहे. त्यामुळे मुद्दा क्र. ३ चे उत्तर हे न्यायालय होकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. ४ बाबत</u>**

१४. मुद्दा क्र. १ ते ३ चे कामी नोंदविलेल्या निरीक्षणावरून वादीस केवळ दावामिळकतीचे हस्तांतरण न करण्याबातची केस असल्यामुळे हे न्यायालय मुद्दा क्र. ४

चे उत्तर खालीलप्रमाणे देत आहे.

## आदेश

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. वादीची दावामिळकतीतील सामाईक वहिवाटीस हरकत करू नये म्हणून प्रतिवादी नं. ११ ते १६ विरुध्द वादीने मागितलेली अंतरिम तुर्तातुर्त मनाईची मागणी नाकारण्यात येत आहे.

३. प्रतिवादी नं. ११ ते १६ तर्फे इसम अगर एजंट यांनी दावा मिळकतीबाबत दावेच्या अंतिम निकालापावेतो विक्री, बक्षिस, लीज, गहाण वा अन्य हस्तांतरणाचे कसलेही व्यवहार करू नयेत म्हणून त्यांना दावेच्या अंतिम निकालापावेतो तुर्तातुर्त मनाई करणेत येत आहे.

४. अर्जाचा खर्च दाव्यासोबत.

Urmila Parashram Koli

Digitally signed by Urmila Parashram Koli
Date: 2020.07.17 17:14:45 +0530

मिरज. ( यु. पी. कोळी )

दि. १४/०७/२०२० २रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, मिरज.

## **CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | K. U. Nadaf |
| Court | : | $II^{nd}$ Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Miraj. |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | : | 17/07/2020 |
| Judgment/Order uploaded on | : | 17/07/2020 |